# “जागतिकीकरण आणि स्पर्धेच्या युगात मूल्य शिक्षणाचे महत्त्व”

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## 1) प्रस्तावना

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत विद्यार्थी स्पर्धेच्या युगात यशस्वी करावयाचा असेल तर शिक्षण, तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट याबरोबर मूल्यशिक्षण विद्यार्थ्यांत रुजविणे काळाची गरज बनलेली आहे. आधुनिक काळात उच्च शिक्षण प्रणालीत मूल्यशिक्षण एक महत्त्वाचा विषय बनला आहे. आजच्या शिक्षणामुळे विद्यार्थी फक्त कारखान्यातील कामगाराप्रमाणे बनला आहे, त्यातून खरा स्वयंपूर्ण, परिपूर्ण विद्यार्थी झालेला दिसत नाही. समाजात फक्त त्याची पुस्तकी गुणवत्ता पाहिले जाते. ती परीक्षार्थी या दृष्टिकोनातून. परंतु तो माणूस म्हणून जगण्यात किती यशस्वी झाला आहे हे पाहिले जात नाही, याचा अर्थ असा की चांगुलपणा, सदाचार, संस्कार, सुसंस्कृतपणा याचा विचार केला जात नाही. यामुळे एकविसाव्या शतकातील विद्यार्थी हा परीक्षार्थी झालेला दिसतो. या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी उच्च शिक्षणात संशोधन करून अभ्यासक्रमाची मांडणी करताना शिक्षण विज्ञान, कला, शास्त्र, तंत्रज्ञान व मूल्यशिक्षण, कृतीयुक्त शिक्षण, पर्यावरण, इत्यादींचा समावेश प्रामुख्याने केला पाहिजे.

जगाच्या पाठीवर मूल्यशिक्षण हे प्राचीन काळापासून दिले जाते. ऐतिहासिक कालखंडातून मुल्ये समाजमनावर रुजविण्याचे कार्य चालू आहे. प्राचीन काळातील विचार केला तर असे निदर्शनास येते की, शिक्षणाचा मूळ उद्देश सुसंस्कारित पिढी निर्माण होणे हा होता. त्यातून सुसंस्कृत, आदर्श, प्रामाणिक, गुणी, प्रेमळ, सहकार्य वृत्ती, चांगुलपणा, आदर्श नेता, आदर्श नागरिक निर्माण होणे ही अपेक्षा अगर उद्देश होता. परंतु ते आज दिसत नाही.

मानवी मनाला मानवी वाढ, विकास व वृद्धीला पैलतिरी जाण्यासाठी मूल्यांची सोबत असणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनात मूल्यांना अनन्य साधारण महत्व आहे. परंतु आज मूल्यांचा विसर पडलेला आहे, तसेच समाजात भ्रष्टाचाराने कळस गाठलेला आहे. व्यक्ती व्यक्तीत जातिवादांची दरी मोठ्या प्रमाणात रुंदावत आहे. इतरांना तुच्छ लेखण्याची विषयवृत्ती बनलेली आहे. तसेच मूल्यांवर अहंपणा, स्वार्थीपणाच्या रोगांनी आक्रमण केलेले आहे. राजकारणातून माणूसपणा नष्ट होत चाललेला आहे.

**2) उद्देश**

1) मूल्यशिक्षणबाबत अभ्यास करणे.
2) मूल्यशिक्षणाची गरज अभ्यासणे.
3) मूल्यशिक्षणाची मूल्य अभ्यासणे.
4) शिक्षणातून मूल्यसंवर्धन अभ्यासणे.

**3) गृहीतके**

1) मूल्यशिक्षण दिले जात आहे.
2) मूल्यशिक्षणाची गरज पुर्ण होत आहे.
3) मूल्यशिक्षणातून मूल्य रूजविली जात आहे.
4) शिक्षणातून मूल्यांचे संवर्धन होत आहे .

**4) मूल्यशिक्षण**

व्यक्तीला जीवन जगत असताना ते अनिर्बंध, अमर्यादित, बेलगांम जगता येत नाही. जीवनाचे हे काही यंत्र नियम आहेत. व्यक्तीचे जीवन खाजगी व स्वतंत्र असते तरी व्यक्तीवर कुटुंब, समाज यांचा अंकुश दिसतो. तत्कालीन काळानुसार त्या व्यक्तीचे वागणे, बोलणे, चालणे, खाणे-पिणे विशिष्ट प्रकारांनीच होणे अपेक्षित असते, तसे न झाल्यास ती वर्तणूक बेशिस्त मानली जाते. कुटुंबात मुलांकडून अपेक्षा असते की, मुलांनी मोठ्यांचे ऐकावे, त्यांचा आदर करावा, सदाचाराने वागावे, "जनीं निंध ते सर्व सोडूनी द्यावे", चोरी करू नये, खोटे बोलू नये, सर्वांवर प्रेम करावे, स्वच्छता व टापटीप यांचा स्वीकार करावा, शिष्टाचाराने वागावे, दया-प्रेम-सहानुभूती सर्वांप्रती दाखवावी.

थोडक्यात असे म्हणता येईल की, सद्गुणांची जोपासना व्हावी. सद्गुण व सदाचार यांचा प्रसार मानवाच्या समाज निर्मितीपासून सुरू झाला आहे. साधुसंतांनीही याच भावनेचा प्रसार-प्रचार आपल्या भक्ती पंथाद्वारे केला, या गुणधर्माला मूल्यशिक्षण म्हटले जाते. नैतिक शिक्षण व धर्म शिक्षणही मूल्यशिक्षण देत असते, चारित्र्यसंवर्धन अर्थात मूल्यशिक्षण अंगी वागविणे हेच शिक्षणाचे प्रमुख कार्य आहे.

आधुनिक काळात सर्वच क्षेत्रात झपाट्याने तंत्रज्ञानाचा शोध व वापर होत असला तरी, २१ व्या शतकात सुखी भविष्यासाठी मूल्यशिक्षण अपरिहार्य आहे. मूल्यशिक्षण म्हणजे नैतिक, व्यवहारिक किंवा सौंदर्यविषयक दृष्टिकोनातून आपल्याला जी बदलांची पसंती जाणवते ते शिक्षण होय. या शिक्षणातून मूल्यांचे संस्कार केले जातात त्याला मूल्यशिक्षण असे म्हणतात. या शिक्षणात सर्व लोकांच्या सहज प्रवृत्तीमध्ये चांगले वळण लावून घेण्याची पात्रता असते. योग्य शिक्षण दिल्यास सहज प्रवृत्तीला अनुसरून जीवन जगणे शक्य होते. सहज प्रवृत्तीवर संस्कार करण्यासाठी कौशल्य अपेक्षित आहे, समाजातील जबाबदार आणि सुज्ञ नागरिक निर्माण करणारे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय. म्हणून असे म्हणता येईल की प्राथमिक शिक्षण ते

उच्च शिक्षणापर्यंत अभ्यासक्रमात मूल्यांबाबत अभ्यासाचा समावेश करणे हे एकविसाव्या शतकाच्या दृष्टीने गरजेची बाब आहे.

### 5) मूल्यशिक्षणाची आवश्यकता / गरज

२१ व्या शतकातील आव्हाने पेलण्यासाठी मुल्ययुक्त संस्कार रुजवून शिक्षण घेतलेला सक्षम विद्यार्थी, नेता तयार होणे काळाची गरज आहे. चारित्र्यसंवर्धनाची, नैतिक शिक्षणाची अगर मुल्यशिक्षणाची आज अधिकच गरज निर्माण झाली आहे. कारण समाजात आज मूल्यांचे झपाट्याने अवमुल्यन होत आहे. दैनंदिन वृत्तपत्र उघडले की त्यात खून, मारामाऱ्या, जाळपोळ, बलात्कार, फसवणूक, आर्थिक घोटाळे व धनदांडगे अन् सत्ता लांडगे यांचे व त्यांच्या कुटुंबीयांचे अमानूष चाळे हेच अधिकांश वाचायला मिळते. “नरेचि केला हीन किती नर” हे प्रत्यंतर येते. दिवसागणिक होणाऱ्या प्रगतीने आणि शैक्षणिक विस्ताराने माणूस खरंच 'माणूस' होतो आहे का ? की प्रगतीच त्याच्या अधोगतीची मृत्युंधरा आहे अशी शंका येते. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच, शिक्षित-अशिक्षित, खेडूत-शहरी, सर्वच अनैतिकतेचा अनिर्बंध वापर करताना दिसतात, त्यामुळे आतून आणि बाहेरून समाज पोखरून निघत आहे. या घर भेद्यांना प्रथम मुल्यशिक्षणाची गरज आहे.

विशेष म्हणजे 400 कोटीची गैरव्यवहार करणाऱ्यांना, स्वार्थापुढे सरकारचे पाय खेचणाऱ्या समता-ममता-ललितांना एका रात्रीत श्रीमंत होणाऱ्यांना, पदे गेली तरी शासकीय घरे न सोडणाऱ्या, लाखांचे कर चुकवून उजळ माथ्याने मिरवणाऱ्यांना जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई करणाऱ्यांना, हुंडा खंडणी उकळणाऱ्यांना, अतिरेक्यांना आश्रय देणाऱ्यांना मूल्यशिक्षणाची देशात गरज आहे त्याशिवाय माणूस म्हणून जगता येणार नाही.

शिक्षणामुळे माणसाच्या ज्ञानाचा विकास होतो परंतु सर्वांगीण विकास होईल असे म्हणता येणार नाही म्हणजे मूल्याशिवाय शिक्षण हे अपूर्ण आहे असे म्हणता येईल म्हणून आपण शिक्षणाबरोबरच मूल्येही जपली पाहिजे

### 6) मूल्ये

आजच्या परिस्थितीत प्रत्येकात मूल्ये असली पाहिजे सर्वसाधारणपणे आपणास दहा मुले दिसतात ती अशी- १. राष्ट्रभक्ती २. राष्ट्रीयएकात्मता ३. सर्वधर्मसहिष्णुता ४.स्त्री-पुरुष समानता ५.श्रमप्रतिष्ठा ६.वैज्ञानिक दृष्टिकोण ७.सौजन्यशीलता ८.संवेदनशीलता ९.वक्तशीरपणा १०. नीटनेटकेपणा.

वरील १० मूल्यांमधून विद्यार्थ्यांच्या विकासाच्या प्रक्रियेत त्याचा सर्वांगीण विकास साधावयाचा आणि त्यांना एक आदर्श नागरिक निर्माण करून त्यांच्यात

विशिष्ट मूल्य निर्माण झाली पाहिजे, आधुनिक युगात २१ व्या शतकात जीवनमूल्यांचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे व त्यातून समस्या निर्माण होत आहे. त्यासाठी विद्यापीठीय शिक्षणात मूल्य शिक्षण हा घटक प्रामुख्याने राबवून शिक्षण हे जीवनावश्यक मूल्य बनविण्याचे एक प्रभावी साधन करणे हे ही महत्त्वाचे काम चालू आहे.

**7) शिक्षणातून मूल्यसंवर्धन**

शिक्षणात अशी क्षमता आहे की, ते मृतवताला संजीवनी देऊ शकते. त्यासाठी उच्च शिक्षकांनी योग्य आदर्श मुलांपुढे ठेवावेत. जगभरातील नररत्नांची उदाहरणे मुलांना सांगावीत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उच्च स्थानी पोहचून वंदनीय झालेले डॉक्टर आंबेडकर, डॉक्टर हॉकिंग डॉक्टर हेलन, केलर, लालबहादूर शास्त्री, इत्यादी गुणीजनांचे उदाहरण विद्यार्थ्यांपुढे ठेवून प्रतिकूल परिस्थितीतही मूल्यांची जोपासना करता येईल. तसेच सद्गुणांच्या पोषणाने नराचा नारायण होऊ शकतो हे ज्ञानेश्वरी व संतांच्या उदाहरणाने ही पटविता येऊन सदाचार हाच खरा धर्म सांगता येईल. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा ही मूल्यांची जोपासना करता येईल. भाषा, इतिहास व विज्ञान या विषयांद्वाराही मूल्यशिक्षण देता येईल. दया-क्षमा-शांती, परोपकार, समाजसेवा, सदाचार, देशभक्ती, विज्ञाननिष्टा, समता, बंधुता, मातृभक्ती व श्रमनिष्ठा इत्यादी मूल्य जाणून शिक्षकांनीही मूल्ये समजावून देऊन विद्यार्थ्यांना आचारणात आणावयास प्रोत्साहन द्यावे.

जगात वावरणाऱ्या प्रत्येक माणसांमधून मूल्य काढून टाकली-अगर मूल्यापासून व्यक्ती, समाज दूर जाऊ लागला, तर माणूस शिल्लक राहणार नाही आणि त्यावेळी पशु धारण केलेली जंगले निर्माण होतील. ही पिढी फक्त शिक्षित किंवा साक्षर होऊन चालणार नाही तर ती मूल्य शिक्षित व्हायला हवी. आजचा विद्यार्थी हा उद्याचा सुजाण नागरिक आहे. देश आणि देशातील वैभव म्हणजे त्या देशातील माणसे होय. मूल्यशिक्षणाचे कार्य अनेक जण करतच आहेत परंतु या कार्यात निष्ठेने झोकून देणाऱ्यांची संख्या किती प्रमाणात आहे ? हे ही पाहणे आजच्या काळाची गरज आहे.

**8) समारोप**

स्पर्धेच्या युगात आपण आज विकासाच्या वेगाबरोबर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत झोकून दिलेले आहे. आपण असे म्हणतो आणि तांत्रिक प्रगती, भौतिक प्रगती यांचा पाठीमागे आपण जास्त जातो. त्यातून प्रगतीही होते आणि आर्थिक स्तर उंचावलेला आपल्याला दिसतो. परंतु हे सर्व घडत असताना तांत्रिक प्रगती होताना मूल्य हरवलेली जीवन पद्धती कधी रुजली, हेच आपल्या लक्षात येत नाही. आपल्या जीवनात जगण्याच्या सर्व सवयी बदलल्या आणि आदर्श माणूस म्हणून बनण्याऐवजी माणुसकी हीन माणूस कधी निर्माण झाला आहे हे समजले नाही. तांत्रिक प्रगती झाली

परंतु माणुसकीची अधोगती झालेली दिसून येत आहे. म्हणून उच्चशिक्षणात माणूस जागा होईल, तो जगाच्या स्पर्धेत आदर्श ठरेल असा सुयोग्य बदल घडवून मूल्यशिक्षणातून तरुण वर्गाला दिशा देण्याचे काम केले पाहिजे, ही काळाची गरज आहे.

**9) संदर्भग्रंथ**

नागतोडे किरण - नैतिक मूल्य शिक्षण, विद्या प्रकाशन नागपूर

ठोंबरे विद्या - नीतिमूल्ये व शिक्षण, नूतन प्रकाशन पुणे

सहस्त्रबुद्धे वि.ह. - शिक्षणातून नैतिक मूल्य संवर्धन, साधना प्रकाशन पुणे